सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सूचना का अधिकार

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.एनयुआर/संघटना/परिचर्या/इतिवृत्त/ई/६/२०१७ दिनांक ८ /०२/२०१७
१४५८

**परिपत्रक - नोटिफिकेशन**

विषय :- नर्सेस व मेट्रन यांच्या विविध मागण्यांबाबत संदर्भात मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण यांनी आयोजित केलेल्या दि.२६.१०.२०१६ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त.

उपरोक्त विषयाबाबत मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात (मुख्य मंत्रालय, तिसरा मजला) दि.२६.१०.२०१६ रोजी बैठक आयोजित केलेली होती. त्या बैठकीचे इतिवृत्त सर्व विविध परिचर्या संघटना व त्यांचे सभासद यांच्या माहितीकरिता पृष्ठ क्र.१ ते १० सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

(डॉ. प्र.ह. शिनगारे)
**संचालक,**
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

# महाराष्ट्र शासन

**क्र : बैठक ३२१६/प्र.क्र.४४/१६५/परिचर्या**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,
गोकुळदास तेजपाल रुग्णालयाची नवीन इमारत
(७ वा मजला), गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
दिनांक :१० जानेवारी, २०१७।

**विषय :** ***नर्सेस आणि मेट्रन यांच्या विविध मागण्यांबाबत संदर्भात मा. मंत्री (वै.शि.) यांच्या समवेत आयोजित केलेल्या दि. २५/१०/२०१६ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त.***

उपरोक्त विषयाबाबत मा. मंत्री (वै.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात (मुख्य मंत्रालय, ३ रा मजला) **दि.२५/१०/२०१६ रोजी** बैठक आयोजित केलेली होती. त्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या कार्यवृत्तांतास मा. मंत्री (वै.शि.) महोदयांनी मान्यता दिलेली आहे. सोबत कार्यवृत्तांत जोडण्यात येत आहे. तद्नुसार संचालकांनी समुचित कार्यवाही करावी आणि या संदर्भात शासनस्तरावरुन कार्यवाही अपेक्षित आहे असे प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करावे, ही विनंती.

सोबत : कार्यवृत्तांत

(संजय कमलाकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, पाचवा मजला बॉम्बे म्युचुअले ॲनेक्स, गनबो स्ट्रीट, रेसेडेन्सी हॉटेल समोर,डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई
४. अध्यक्ष, महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन, खोली नं.८, सेवासदन परिचारिका वसतिगृह, जुने यशवंतराव चव्हाण भवन शेजारी, रेड बिल्डींग, सोमवार पेठ, पुणे-४११ ००१.
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शासकीय अधिसेविका असोसिएशन, सर ज.जी. समुह रुग्णालय, भायखळा, मुंबई
६. अधिक्षिका, सुश्रुषा सेवा, संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

**प्रत अग्रेषित :-**
मा. मंत्री (वै.शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी.
उपसचिव (परिचर्या), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.

# मा.मंत्री (वै.शि.) यांचे दालनात दिनांक २५.१०.२०१६ रोजी परिचर्या संवर्गातील विविध संघटनांसोबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत

| अ.क्र. | संघटनेने उपस्थित केलेले मुददे | बैठकीत ठरलेले निर्णय |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन** | |
| १ | ऑक्टोबर २०१६ रोजी न्यायालयातील याचिका मागे घेतली उच्चस्तरीय चर्चेत आश्वासन मिळूनही अजुन बदामी रंगाचे गणवेशाचे आदेश मिळाले नाहीत ते मिळावेत. | प्रस्तुत प्रकरण शासनाच्या विचाराधीन होते, त्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.एनयुआर २०१६/ प्र.क्र.०३/२०१६/ परिचर्या दिनांक २५.१०.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आला असुन परिचर्या संवर्गासाठी बदामी रंगाचा गणवेश निश्चित करण्यात आलेला आहे. |
| २ | वैदयकीय शिक्षण विभागात परिचारिकांची पदे वाढविली आहेत तरीपण रिक्त पदे आहेत सर्वच स्तरावर ती भरावीत. | वित्त विभाग, शासन परिपत्रक, दिनांक १५.०१.२०१६ अन्वये एकुण संवर्गाच्या ४ टक्के किंवा रिक्त पदांच्या ५० टक्के यापैकी जी संख्या कमी असेल तितकी पदे भरण्याची मुभा आहे. सबब परिचर्या संवर्गातील मोठया प्रमाणात रिक्त असलेली पदे गेल्या ३ वर्षात सुमारे ९० टक्क्यांपेक्षा जास्त प्रमाणात सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. उर्वरित पदोन्नतीची पदे संचालनालय स्तरावरुन लवकरच भरण्यात येतील असे बैठकीच्या वेळी मान्य करण्यात आले. |
| ३ | अनेक अधिसेविकांची पदे रिक्त आहेत. कार्यभार दिल्याने निर्णय होत नाहीत ती पदे त्वरीत भरावीत. | केवळ नांदेड, कोल्हापुर व अंबाजोगाई येथे अधिसेविकांची पदे रिक्त आहेत तर इतर सर्व रुग्णालयात अधिसेविकांची पदे भरण्यात आलेली आहेत. त्यामुळे सदर रिक्त असलेली पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| ४ | समाजात सर्वत्र परिचारीकांची गरज असतांना शासकीय वैदयकीय महाविद्यालयातील २० पदे विद्यार्थ्यीनीची कमी केलीत ती करु नयेत. | भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकानुसार शिक्षक विदयार्थी प्रमाण १:१० हे निश्चित असल्याने उपलब्ध विद्यार्थ्यांना पुरेसे शिक्षक उपलब्ध होण्यासाठी शिक्षकांची वाढीव पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, त्यास मान्यता मिळताच आपोआप त्या प्रमाणात विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यात येईल. |
| ५ | चंद्रपुर जिल्हा रुग्णालय नव्याने आपल्याकडे आले तेथील परिचारीकांची जी पदे भरली त्यांना ६ महिने झाले वेतन मिळालेले नाही त्यांना नियमितपणे वेतन मिळावे. | सदर रुग्णालयातील वेतनावरील खर्चासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष अद्याप उपलब्ध नसल्याने सदर उशिर झालेला आहे. तथापी ही तांत्रीक बाब असून लवकरच त्यात दुरुस्त केली जाईल व माहे नोव्हेंबर २०१६ पासुन नियमित वेतन व थकीत असलेल्या वेतनाची पुर्तता करण्यात येईल. |
| ६ | अधिसेविका आणि पाठयनिर्देशिका कोणताही गणवेश परिधान न करता साध्या वेशात कामावर येतात म्हणजेच त्यांना गणवेशाची गरज नाही का, त्या इतरांपेक्षा वेगळया आहेत काय, मग जर विना गणवेश सेवा अधिकृत करता येत असले तरी आम्ही पण गणवेश न घालता कामावर यावे का | मुद्दा क्र.१ मध्ये नमुद केलेला गणवेशाबाबत शासन निर्णय सर्व अधिकारी व कर्मचारी यांना लागु करण्यात आलेला आहे. तरीही काही संघटनांनी त्यास विरोध दर्शविल्याने पांढरा गणवेश व बदामी गणवेश परिधान करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. अधिसेविका व पाठ्यनिर्देशिका यांनी कर्तव्यावर येतांना गणवेश परिधान करणेबाबत अधिष्ठाता यांनी पाहणे गरजेचे आहे. |

| अ.क्र. | संघटनेने उपस्थित केलेले मुद्दे | बैठकीत ठरलेले निर्णय |
|---|---|---|
| ७ | कोणतेही नवे युनिट अगर रुग्णालय सुरु करतांना त्यासाठी लागणारा संवर्ग नियुक्त करुन मगच विभाग कार्यान्वीत करावा. | शासनाचे रुग्णालय सुरु करतांना पूर्णत: कार्यान्वीत होण्यापुर्वी तांत्रीक बाबीची पुर्तता झाल्यानंतरच त्यासाठी लागणारा आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| ८ | परिचारीकांचे वेतन, भत्ते सेवापुस्तके, कालबध्द पदोन्नती, आश्वासीत सेवा पदोन्नती, अनुज्ञाप्ती शुल्क, निवृत्तीवेतन, वैदयकीय परतावा, भ.नि.नि.च्या पावत्या,वेतनाची माहितीप्रत या सर्व नोंदी परतावे वेळेवर मिळावेत, मिळतच नाहीत. | संचालनालय स्तरावरुन सर्व संबंधित संस्थांकडून माहिती गोळा करण्यात येईल व त्यानंतर सर्व अधिसेविका व प्रशासकीय अधिका-यांची या बाबतीत सविस्तर बैठक घेऊन उचित निर्णय घेण्यात येईल. |
| ९ | संगणकावर काम करण्यासाठी संगणक ऑपरेटर नियुक्त करावेत हे काम करायचे तर रुग्णांची कामे कोणी कधी करायची | एमएससीआयटी हा संगणकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेला असल्यामुळे परिचारीकांनी दैनंदिन कामे सांभाळून रुग्णाशी संबंधित असलेल्या आवश्यक त्या सर्व नोंदी संगणकावर घेण्याचे काम कार्यरत परिचारीकेने करणे नियमानुसार अभिप्रेत आहे. |
| १० | वर्ग-३ ची अधिसेविकांची पदे वाढविली तरी पण अधिसेविका कार्यालयात कारकुनी आणि इतर कामासाठी परिसेविका आणि अधिपरिचारीका आपल्या कार्यालयात ठेवून घेतात त्यांच्या नियुक्त्या रुग्णसेवेसाठी आहेत त्यांना कक्षात पाठवावे. मा.संचालकांनी आदेश काढुनही अंमलबजावणी केली नाही. | परिचारीका संवर्गाच्या अडचणी हाताळण्यासाठी अतांत्रीक पदांऐवजी संवर्गातील कर्मचारी जास्त कुशलतेने हाताळण्यास सक्षम आहेत. सबब खुद्द संचालनालयात ३ पदे संवर्गातील परिचारिकांमधून उसनवारी तत्वावर सेवा देत आहेत. सबब हा अपवाद वगळता सदर आदेशाची योग्य अंमलबजावणी होण्याबाबत सर्व अधिसेविकांना कळविण्यात येईल. |
| ११ | पुणे, मुंबई, नागपुर, औरंगाबाद येथे आरोग्य विज्ञान विदयापीठ यांच्या अधिपत्याखाली बीएस्सी नर्सिचे पदवी अभ्यासक्रम सुरु केले येथील जीएनएम अभ्यासक्रम पुन्हा सुरु करावे असे यावर्षी करण्याचे मान्य केले होते त्याचे इन्फ्रास्टक्चर आहे तसेच पदवी अभ्यासक्रमासाठी फी आकारली जाते त्यामुळे कनिष्ठ आर्थिक उत्पन्न गटातील तरुणी वंचित झाल्या आहेत या परिचारीकांची समाजात गरज आहे. भा.प.प व म.प.प ने बंद केलेले नाही. पदवीधरांचा उपयोग दैनंदिन कामात होत नाही या चारही ठिकाणी जीएनएम अभ्यासक्रम सुरु करावा. पदवीधरांना प्रात्यक्षिकाचा अनुभव मिळत नाही त्यांची मनाची तयारी नाही त्यामुळे आम्हाला मनुष्यबळ कमी पडते. त्या विद्यार्थीनी रुग्णसेवेला मदत करीत होत्या. | राज्यात ४ ठिकाणी बेसिक बीएस्सी नर्सिंग व नागपुर येथे एमएस्सी नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता मिळालेली आहे. तथापी या ४ ठिकाणी बंद करण्यात आलेला जीएनएम अभ्यासक्रम पुर्ववत सुरु करणेबाबत वेगळयाने संचालकांशी सल्लामसलत करुन निर्णय घेण्यात येईल. |
| १२ | चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गाची अनेक पदे रिक्त आहेत त्यांच्या कामाचा ताण आमच्यावर पडतो. रुग्णाची वाहतुक, जेवण व नाश्ता, चहावाटप, स्वच्छता ही कामे अडचणीत आहेत त्याचा परिणाम रुग्णसेवेवर होत आहे ती पदे भरावीत. | सदर बाब धोरणात्मक असल्यामुळे त्याबाबत शासन स्तरावरुन उचित कार्यवाही करावी. |
| १३ | सहसंचालक हे पद खरे नर्सिंगचे आहे. आता पदवीधर, पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या महिला हया क्षेत्रात आहेत त्यांना ते दयावे. व्यावसायिक तक्रारीची दखल घेतली | सदर मागणीचा योग्य विचार केला जाईल असे बैठकीत ठरले. |

| अ.क्र. | संघटनेने उपस्थित केलेले मुददे | बैठकीत ठरलेले निर्णय |
|---|---|---|
| | जाईल असा विश्वास वाटतो. | |
| १४ | रुग्णांच्या नातेवाईकांकडून म्हणण्यापेक्षा गुंडाकडून हल्ला होण्याचे प्रमाण वाढले आह. कामावर असतांना सुरक्षितता हवी जीव मुठीत धरुन आम्ही कामे करतो. | प्रत्येक हॉस्पीटल मध्ये ४ शस्त्रधारी पोलीस तैनात करणेबाबत गृहविभागास लवकरच प्रस्ताव सादर करण्यात येईल. |
| १५ | अशा घटना घडल्यानंतर प्रशासनाने म्हणजे निवासी डॉक्टरांनी एफआयआर नोंदवावा. स्टेंटमेट संबंधित व्यक्ती देतील. | प्रथम खबरी अहवालाची नोंदवही पोलीस स्टेशनबाहेर नेता येत नसल्याने व ज्याच्यावर अन्याय झाला त्यानेच पोलीस स्टेशनमध्ये जाऊन एफआयआर दाखल करणे गरजेचे आहे. त्यासाठी लागणारे सहकार्य रुग्णालयातील अधिकारी व कर्मचा-याकडून देण्यात येईल. मात्र स्टेंटमेंट देणे नियमानुसार गरजेचे असल्याने, परिचारीकांवर हल्ला झाल्यास त्यांच्यावतीने तक्रार देण्यास निवासी डॉक्टर सक्षम नाहीत, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. |
| १६ | सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार ग्रेड पे आणि प्री रिव्हाईज्ड पे आम्हाला मिळत नाही त्यामुळे सातव्या वेतन आयोगात अन्याय संभवतो तो दूर करावा. | सातव्या वेतन आयोगासंबंधी समिती गठीत होईल त्यावेळी संबंधिताच्या वेतनासंबंधी काही त्रुटी असल्यास त्याची पुर्तता करण्याची बाब वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यात येईल. |
| १७ | विद्यार्थीनींचे विद्यावेतन इतकी महागाई वाढूनही २५ वर्षात वाढले नाही ते वाढवावे | संचालनालयाने विहित नमून्यात प्रस्ताव सादर करावा व त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| १८ | शस्त्रक्रिया विभागात काम करणा-या सर्व परिचारिकांना थियेटर भत्ता मिळावा सध्या त्यात वाढ करावी. | संचालनालयाकडून याबाबत सर्व महाविद्यालये व रुग्णालये यांचेकडून माहिती मागवून तद्नंतर उचित प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल. |
| १९ | चवथ्या वेतन आयोगापासून शिफारशीनुसार भत्ते वाढविले नाहीत ते वाढवावे | सदर बाब धोरणात्मक असल्याने त्या संबंधात स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल. |
| २० | संघटनेला शासन मान्यता दयावीं ३ वेळा अर्ज केलेत काही कळतच नाही काय झाले | संघटनेने विहीत नमुन्यात शासन मान्यतेचा प्रस्ताव फेर सादर करावा त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल असे बैठकीत ठरले. |
| २१ | वापरा आणि फेका (युज आणि थ्रो )ग्लोव्हज पुरवावेत त्यात वेळ जातो मनुष्यबळ कमी पडते धोरणात्मक निर्णयाची मागणी | युज आणि थ्रो ग्लोव्हज पुरवण्याबात योग्य ती कार्यवाही लवकरच करण्यात येईल. |
| २२ | कंत्राटीकरण आणि खाजगीकरण कोणत्याही सेवेचे करु नये त्याला आमचा विरोध आहे आणि राहील | सदर बाब धोरणात्मक असल्याने त्या संबंधात स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल. |
| २३ | निरंतर शिक्षण योजनेसाठी स्वतंत्र निवेदन सादर करीत आहोत. | सदर निवेदन प्राप्त झाल्यानंतर त्यावर कार्यवाही करण्यात येईल. |
| २४ | परिचर्या व्यवसाय हा महिला प्रधान व्यवसाय आहे विशेष गुणांनी त्यांनी जोपासला आहे यात १ टक्के पुरुषाला प्रवेश होता आता १० टक्के वरुन वाढून ३० टक्के केला आहे तो पुर्वीप्रमाणेच १० टक्के ठेवावा. सर्व अभ्यासक्रमात या व्यवसायात १० टक्क्यापेक्षा वाढ करु | सदर बाब धोरणात्मक असुन एमएनसी यासंबंधीच्या शिफारशी विचारात घेऊन निर्णय घेण्यात येईल. |
| | नये. | |

| अ.क्र. | संघटनेने उपस्थित केलेले मुददे | बैठकीत ठरलेले निर्णय |
|---|---|---|
| २५ | परिचर्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीसाठी राज्य शासनाकडून एकही पुरस्कार दिला जात नाही. | याबाबत धन्वंतरी पुरस्कार लवकरच सुरु केला जाईल |
| | **ट्रेंड नर्सेस असोसिएशन, प.वं.पा.शा.रुग्णालय, सांगली** | |
| १ | गणवेशाचा रंग पांढरा असावा. | प्रस्तुत प्रकरण शासनाच्या विचाराधीन होते, त्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.एनयुआर २०१६/ प्र.क्र.०३/२०१६/ परिचर्या दिनांक २५.१०.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आला असुन परिचर्या संवर्गासाठी बदामी रंगाचा गणवेश निश्चित करण्यात आलेला आहे. तथापी, काही संघटनांनी त्यास विरोध दर्शविल्याने पांढरा गणवेश व बदामी गणवेश परिधान करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. |
| २ | गणवेश,धुलाई व आहार भत्ता वाढवून मिळावा. | संचालनालयाकडून याबाबत उचित प्रस्ताव लवकरच मागविण्यात येईल व त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. संघटनेने याबाबत आवश्यक माहितीसह प्रस्ताव सादर करुन सहकार्य करावे. |
| ३ | व्यावसायिक जोखीम भत्ता मिळावा. | सदर निर्णय हा धोरणात्मक असल्याने याबाबत योग्य वेळी वित्त विभागामार्फत राज्याची आर्थिक स्थिती विचारात घेऊन उचित निर्णय घेण्यात येईल. संघटनेने याबाबत पाठपुरावा करावा. |
| ४ | सर्व नर्सेसना जुनी पेन्शन योजना लागु करावी. | महाराष्ट्र शासनाने नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त होणा-या सर्व राज्य शासकीय कर्मचा-यांना अंशदायी पेंशन योजना लागु केली आहे तीच योजना परिचर्या संवर्गासही लागू आहे. त्यामुळे बदल करण्याचा घा परिचर्या संवर्गास डावलण्याचा प्रश्नच उदभवत नाही. |
| ५ | प्रत्येक प्रमोशनला १ इन्क्रीमेंट मिळावे. | प्रत्येक पदानुसार ग्रेड वेतनात फरक असल्याने नियमित पदोन्नती नंतर वेतनात वाढ होणे सहाजिक आहे, तथापी आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ आधीच मिळालेला असल्यास पुढच्या पदाचे वेतन कर्मचारी आधीच उपभोगत असतो, त्यामुळे प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यानंतर स्वतंत्र वेतनवाढ अनुज्ञेय नाही. महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियमात तशी तरतुदही नाही. |
| ६ | सामाजिक आरोग्य परिसेविका, मनोरुग्ण परिसेविका, बालरुग्ण परिसेविका यांना त्यांच्या शैक्षणिक दृष्टीने पद देतेवेळी १ इन्क्रीमेंट मिळावे. | महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियमात तशी तरतुद नाही. |
| ७ | परिसेविका, विभागीय परिसेविका, सहाय्यक अधिसेविका, अधिसेविका यांची पदे रिक्त राहणार नाही याची संचालनालयाकडून दक्षता घेण्यात यावी. | सदर रिक्त पदे नियमानुसार भरण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. |
| ८ | पदोन्नती काढतांना संचालनालयाकडून अनेकदा जेष्ठता डावलून कनिष्ठांना पदोन्नती देण्यात आली आहे. या बाबत वारंवार तक्रारी करुनही उपयोग झाला नाही. याबाबत लक्ष घालावे. | कर्मचा-यांच्या जेष्ठतासुचीनुसार पदोन्नतीसाठी विचार करण्यात येतो. तथापी, काही कर्मचारी त्याच ठिकाणी पदोन्नती मिळावी या अपेक्षेने पदोन्नतीच नाकारत असल्यामुळे त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या कर्मचा-यांना इतरत्र ठिकाणी पदोन्नती दर्शवून त्यांची रिक्तपदी |

| अ.क्र. | संघटनेने उपस्थित केलेले मुददे | बैठकीत ठरलेले निर्णय |
|---|---|---|
| | | पदस्थापना करणे क्रमप्राप्त ठरते. |
| ९ | नर्सेस फेडरेशनच्या दादागिरीला आळा घालावा. | दोन्ही संघटनांनी याबाबत सामोपचाराने मार्ग काढावा यात शासनाची अथवा संचालनालयाची भुमिका नाही. |
| १० | किरकोळ बांधकामाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मिळावेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहकार्य मिळत नाही. | किरकोळ बांधकामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करुन घेण्याची जबाबदारी प्रत्येक रुग्णालयाच्या आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकाऱ्यांची असल्याने त्यात परिचार्या संवर्गाची भूमिका नाही. |
| **महाराष्ट्र राज्य शासकीय राजपत्रित अधिसेविका असोसिएशन,पुणे** | | |
| १ | काही अधिसेविकांचे सहा वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटूनही परिविक्षाधीन कालावधी समाप्तीचे आदेश अदयापही मिळालेले नाहीत. विशेषत: श्रीमती शेख,नवलकर व पैठणकर | संचालनालयाकडून प्राप्त प्रस्तावांवर कार्यवाही चालू आहे. तसेच ज्या प्रस्तावांमध्ये त्रुटी आहेत त्या त्रुटी दूर करण्याची कार्यवाही चालू आहे असे बैठकीत ठरले. श्रीमती शेख, नवलकर व पैठणकर या अधिकाऱ्यांच्या बाबतीत त्रुटी असल्यामुळे प्रस्ताव शासनास सादर झालेले नाही असे बैठकीत सहसंचालकांनी सांगितले. |
| २ | अधिसेविका या पदनामाऐवजी परिचर्या अधिक्षिका हे पदनाम करावे ही विना खर्चाची मागणी आहे. | भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकानुसार परिचर्या संवर्गातील सेवा/शैक्षणिक अशा सर्वच पदनामांचा फेर आढावा घेण्याबाबतचा प्रस्ताव एकत्रितपणे संचालनालयाकडून शासनास लवकरच सादर केला जाईल. |
| ३ | शासन निर्णय दिनांक ०३.०४.२०१२ अधिसेविका वर्गातील ग्रेड ३ हा काढुन टाकण्यात आलेला आहे व त्या पदाचे ग्रेड २ व ग्रेड १ मध्ये रुपांतर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु अदयापपर्यंत याप्रमाणे आदेश प्राप्त झालेले नाहीत. तसेच आमची मुळ मागणी सर्वच ग्रेड काढुन टाकण्याची आहे. ग्रेड १ व ग्रेड २ ऐवजी फक्त वर्ग १ व वर्ग २ अशीच पदे ठेवावीत. | शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. याबाबत श्रेणी-३ मधुन श्रेणी-१ व श्रेणी-२ मध्ये पदस्थापना करण्या संदर्भात व पदस्थापना करतांना सदर अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार असल्याने सदर प्रस्ताव माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये सादर करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. |
| ४ | सहाव्या वेतन आयोगात केंद्राप्रमाणे वेतन संरचना मिळाली नसल्याने अधिसेविका वर्गावर आर्थिकदृष्टया अन्याय झालेला आहे तरी केंद्राप्रमाणे वेतन संरचना लागु व्हावी. | सातव्या वेतन आयोगासंबंधी समिती गठीत होईल त्यावेळी संबंधिताच्या वेतनासंबंधी काही त्रुटी असल्यास त्याची पुर्तता करण्याची बाब वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यात येईल. |
| ५ | परिचर्या संवर्गाकरिता स्वतंत्र संचालनालय असावे. | सदर बाब ही धोरणात्मक असल्याने शासनाची आर्थिक परिस्थिती विचारात घेता, पदांची निर्मिती, संचालनालयाकरीता वेगळी जागा व इतर बाबींवरील खर्च इ. गोष्टींचा विचार करणे शक्य नसल्याने भविष्यात निर्णय घेण्यात येईल. |
| ६ | ज्या अधिसेविका शैक्षणिक पदासाठी इच्छुक व पात्र असतील त्यांना त्याकरिता संधी देण्यात यावी. | अधिसेविकांची शैक्षणिक पात्रता लक्षात घेऊन त्यांच्या सेवेचा एक भाग म्हणूनच ज्या अधिसेविका इच्छूक असतील त्यांना आपले सेवाक्षेत्रातील दैनंदिन काम सांभाळून विनामानधन व शैक्षणिक पदाचा स्वतंत्र कार्यभार न देता शिकविण्याची मुभा राहील. |
| | | |

| अ.क्र. | संघटनेने उपस्थित केलेले मुददे | बैठकीत ठरलेले निर्णय |
|---|---|---|
| ७ | संचालनालय, वैदयकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यामधील सहसंचालक हे एक पद नर्सिग मध्ये देण्यात यावे अशी तरतुद डिएमई १९७५ या शासन निर्णयात असताना देखील अद्यापपर्यंत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. तरी कृपया कार्यवाही व्हावी. | शासकीय अभिलेख्यात सदर शासन निर्णय आढळून येत नसून तो उपलब्ध करुन दिल्यास त्याची वैधता तपासून त्यावर उचित विचार करण्यात येईल. |
| ८ | रुग्णालयातील शुश्रुषा सहाय्यक हे पद संचालनालय स्तरावर मंजुर आहे यासाठी वित्तीय तरतुद पण आहे (दिनांक २२.०४.२००९ वित्त विभागाची अधिसुचनेनुसार) परंतु ही पदे अदयापपर्यत भरलेली नाहीत. कृपया ही पदे भरावीत. | सदरची बाब संचालनालय स्तरावर तपासून घेऊन उचित निर्णय घेण्यात येईल |
| ९ | अधिसेविकांसाठी पदसिध्द राखीव निवासस्थान असावे. | अशा प्रकारची व्यवस्था अनेक शासकीय वैदयकीय महाविदयालय व रुग्णालयात पुर्वीपासूनच आहे. ज्याठिकाणी व्यवस्था नसेल अशा संस्थांना संचालनालयामार्फत कळविण्यात येईल. तथापि, अनेक अधिसेविका शासकीय निवासस्थानात राहण्यास इच्छूक नसतात असे निदर्शनास आले आहे. तसेच ज्या अधिसेविकांना शासकीय निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर त्यांनी ते स्विकारले नसल्यास त्यांना देय असलेले घरभाडे भत्ता,अनुज्ञप्ती शुल्क व इतर अनुषंगिक भत्यास प्रतिबंध असेल. |
| १० | बदामी रंगाच्या गणवेशाच्या आदेशाचा अधिसेविकांच्या अनुषंगाने पुर्नविचार व्हावा. | सर्व परिचर्या संवर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांकरीता दि.२५/१०/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला शासन निर्णय बंधनकारक करण्यात आलेला आहे. तथापि, अधिसेविकांना बदामी रंगाच्या गणवेशाबाबत आक्षेप असल्यास एकमताने समुचित गणवेशाचा प्रस्ताव संचालनालयामार्फत शासनास सादर करावा त्यावर विचार करण्यात येईल. |
| | **महाराष्ट्र राज्य परिचर्या संघटना, मुख्य कार्यालय, लातुर** | |
| १ | परिचारीका संवर्गातील वर्ग २ व वर्ग ३ पदांच्या वेतनश्रेणीत एकच असुन फक्त ग्रेड पे मध्ये २०० ते ४०० रुपयाचा फरक आहे. हा वेतनश्रेणीमध्ये होणारा अन्याय सातव्या वेतनश्रेणीमध्ये दुर करण्यात यावा. त्यास्तव या संघटनेचे प्रतिनिधींना सातव्या वेतन आयोगा संबंधीत होणा-या चर्चेमध्ये सहभागी करण्यात यावेत. | सातव्या वेतन आयोगासंबंधी समिती गठीत होईल त्यावेळी संबंधिताच्या वेतनासंबंधी काही त्रुटी असल्यास त्याची पुर्तता करण्याची बाब वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यात येईल. |
| २ | सर्व उच्चशिक्षीत परिचारीका ज्यांनी मुलभूत परिचारीका शिक्षणानंतर पदवीका पूर्ण केलेली आहे त्यांना आगाऊ २ वेतनवाढी व ज्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेले आहे त्यांना आगाऊ ४ वेतनवाढी तसेच ज्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले आहे त्यांना ५ वेतनवाढी आगाऊ देण्यात याव्यात.(सध्या वैदयकीय अधिका-यांना त्या मिळत आहेत.) | या संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा नियमात कोणत्याही प्रकारची तरतुद नसल्यामुळे मागणी मान्य करणे शक्य नाही. |
| | | |

| अ.क्र. | संघटनेने उपस्थित केलेले मुददे | बैठकीत ठरलेले निर्णय |
|---|---|---|
| ३ | सर्व परिचारीकांना उच्च शिक्षण घेण्यासाठी पगारी रजा देण्यात यावी. सदयस्थितीत परिचारीकांना फक्त २ वर्षे पगारी रजेची तरतुद आहे ती वाढवून अमर्यादेत करण्यात यावी. जशी डॉक्टरांना सदयस्थितीत मिळत आहे. | महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियमात संपूर्ण सेवाकालावधीत अध्ययनासाठी कमाल २ वर्षाची अध्ययन रजा मंजूर करण्याची तरतुद आहे. तथापी, उच्च शिक्षणासाठी असाधारण रजा मंजूर करण्याची तरतुद नियमात असल्यामुळे २ वर्षापेक्षा जास्त पगारी रजा मंजूर करणे शक्य नाही. |
| ४ | पश्चिम बंगाल या राज्यात असल्याप्रमाणे महाराष्ट्रातही परिचर्या संवर्गाचे स्वतंत्र संचालनालय तयार करण्यात यावे. | सदर बाब ही धोरणात्मक असल्याने शासनाची आर्थिक परिस्थिती विचारात घेता, पदांची निर्मिती, संचालनालयाकरीता वेगळी जागा व इतर बाबींवरील खर्च इ. गोष्टींचा विचार करणे शक्य नसल्याने भविष्यात निर्णय घेण्यात येईल. |
| ५ | भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांच्या निकषाप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व परिचर्या विद्यालयामध्ये प्राचार्य, उपप्राचार्य व पाठयनिर्देशिक ही पदे तात्काळ मंजूर करण्यात यावीत. | सदर बाब शासनाच्या विचाराधीन असुन त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. |
| ६ | परिचारीका संवर्गातील सर्व पदांचे सेवाप्रवेश नियमात सुधारणा करुन तात्काळ संमत करण्यात यावेत. | शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे व लवकरच याबाबत निर्णय घेतला जाईल. |
| ७ | विद्यार्थी परिचारीकांचे विद्यावेतन गेल्या २० ते २५ वर्षापासुन वाढविण्यात आलेले नाही (सद्या ते ३०० रुपये प्रतिमहिना आहे) ते तात्काळ वाढविण्यात यावे. | या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव संचालनालयामार्फत शासनास सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या. तथापी, याबाबत वित्त विभागाच्या मान्यतेनंतरच विद्यावेतन वाढविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. |
| ८ | भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेला Independent Nurse Practitioner हा अभ्यासक्रम महाराष्ट्रातही सुरु करण्यात यावा. | संचालनालयाकडून उचित प्रस्ताव सादर झाल्यास शासनामार्फत कार्यवाही करण्यात येईल |
| | **महाराष्ट्र सरकारी परिचारीका प्रगती संघटना (सर ज.जी.रुग्णालय,मुंबई)** | |
| १ | सर्व परिचारीकांचा गणवेश पांढरा असावा. | प्रस्तुत प्रकरण शासनाच्या विचाराधीन होते, त्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. एनयुआर २०१६/ प्र.क्र.०३/२०१६/ परिचर्या दिनांक २५.१०.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आला असुन परिचर्या संवर्गासाठी बदामी रंगाचा गणवेश निश्चित करण्यात आलेला आहे. तथापि, काही संघटनांनी त्यास विरोध दर्शविल्याने पांढरा गणवेश व बदामी गणवेश परिधान करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. |
| २ | सर्व शासकीय रुग्णालयामध्ये कार्यरत असलेल्या सर्व अधिसेविका व पाठयनिर्देशिका यांना पारंपारीक गणवेश घालणे सक्तीचे करण्यात यावे. अन्यथा सर्व परिचारीकांचे गणवेश भत्ता बंद करण्यात यावे. | |
| ३ | ६ व्या वेतन आयोगाच्या वेळी परिचारीकांच्या वेतनातील व अन्य भत्यातील त्रुटींची पुर्तता सातव्या वेतन आयोगाच्या वेळेस करण्यात याव्यात. | सातव्या वेतन आयोगासंबंधी समिती गठीत होईल त्यावेळी संबंधिताच्या वेतनासंबंधी काही त्रुटी असल्यास त्याची पुर्तता करण्याची बाब वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यात येईल. |
| ४ | हायपॉवर कमिटीच्या शिफारशीनुसार विशेष प्रशिक्षीत परिचारीकांना त्यांच्या ग्रेड पे नुसार न्याय देण्यात याव्यात. | सदर निर्णय हा धोरणात्मक असल्याने संचालनालयाकडून प्रस्ताव सादर झाल्यास याबाबत योग्य वेळी वित्त विभागामार्फत राज्याची आर्थिक स्थिती |